महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांक:- ३० मार्च, २०२२

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:**- सहायक आयुक्त (विभाग अधिकारी), बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका वरिष्ठ सेवा, गट अ चाळणी परीक्षा २०२१

**संदर्भ:**- आयोगाचे प्रसिध्दीपत्रक क्रमांक एनओटी-३६१७/सीआर-२४/२०२०/प. रा.३/२१, दिनांक २३ मार्च, २०२२

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजी आयोजित सहायक आयुक्त (विभाग अधिकारी), बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका वरिष्ठ सेवा, गट अ चाळणी परीक्षा २०२१ च्या निकालाद्वारे अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांनी प्रस्तुत जाहिरातीस अनुसरुन सादर केलेल्या अर्जातील दाव्याच्या अनुषंगाने संबंधित कागदपत्रे/प्रमाणपत्रे दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी २३.५९ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने अपलोड करण्याबाबत संदर्भाधीन प्रसिध्दीपत्रकाद्वारे सूचित करण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी ऑनलाईन पध्दतीने कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करण्याकरीता दिनांक ३ एप्रिल, २०२२ रोजी २३.५९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत निकालाद्वारे अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना ‘नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र’ अपलोड करण्याकरीता तांत्रिक अडचण निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. यास्तव, अर्जामध्ये ‘नॉन-क्रिमीलेअर’चा दावा केलेल्या तथापि ऑनलाईन पध्दतीने कागदपत्रे अपलोड करताना ‘नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र’ अपलोड न केलेल्या उमेदवारांना ‘नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र’ अपलोड करण्याकरीता पुन्हा संधी देण्यात येत आहे.

**३.** संबंधित उमेदवारांनी आयोगाच्या दिनांक २३ मार्च, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकानुसार लागू असलेली सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ‘ONLINE FACILITIES’ अंतर्गत ‘upload documents’ या मेन्यूमध्ये दिनांक ३ एप्रिल, २०२२ रोजी २३.५९ पर्यंत अपलोड करणे अनिवार्य आहे.

**४.** संबंधित सर्व कागदपत्रे/प्रमाणपत्रे विहित कालावधीत अपलोड न केल्यास अशा उमेदवारांचा प्रस्तुत पदाच्या निवडप्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

ठिकाण: मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग